MHSN010036572022

**फौजदारी जामीन अर्ज नं. १०००/२०२२**

(सुरज रामचंद्र पाटील वि. महाराष्ट्र शासन वगैरे २ )

**नि.क्र. १ च्या अर्जावर आदेश**

**१.** आरोपीने हा अर्ज फौ.प्र.संहितेच्या कलम ४३८ खाली अटकपूर्व जामीनाचा दिला आहे. त्याचे थोडक्यात कथन असे की, कवठेमहांकाळ पोलीस ठाणे यांचेकडे गु.नों.क्र. ३२०/२०२२ मध्ये त्याचे विरुद्ध भा.द.वि. कलम ३२३, ५०४ सह कलम ३४ आणि अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम कलम 3(1)(r) (S),3(2)(va), अन्वये गुन्हा केल्याचा आरोप आहे. त्याचे पुढे कथन असे की, मला या कामी निष्कारण गोवण्यात आले आहे. फिर्यादी महिला आणि तिचा नवरा यांना विनाकारण 'अॅट्रोसिटी' चे गुन्हे दाखल करण्याची सवय आहे. घटनेपासून फिर्याद देण्यास १५ दिवसांचा विलंब झाला आहे. माझ्याकडून हस्तगत करण्यासारखे काहीही नसल्याने, माझी कोठडी अनावश्यक आहे. माझी गुन्हेगारी पाश्वभूमी नाही. या आधी सह आरोपींचे जामीन अर्ज मंजूर झाले आहेत. तरी मला अटकपूर्व जामीनावर सोडावे .

**२.** सरकारपक्षा तर्फे या अर्जास त्यांचे लेखी म्हणणे नि.६ ला दिले आहे. त्यात त्यांचे कथन असे की जर हा अर्ज मंजूर केला तर, अर्जदार फिर्यादी व साक्षीदारांवर दबाव आणेल तसेच त्यांच्यावर पुन्हा हल्ला करण्याची शक्यता आहे. तरी हा अर्ज फेटाळावा.

३. मूळ फिर्यादी तर्फे या अर्जास लेखी हरकत नि.८ ला देण्यात आली आहे. त्यात तिचे कथन असे की, अर्जदार व इतरांनी मिळून ता.२३.०६.२०२२ आणि २१.०७.२०२२ या दोन दिवशी माझ्या घरच्या अंगणात येऊन, मला जातीवाचक शिवीगाळ केली. त्यानंतर त्यांनी मला चपलांनी माराहाण करुन, भर रस्त्यात फरफटत ओढत नेले. त्यामुळे माझ्या बांगडया फुटल्या आणि कपडे अस्ताव्यस्त होऊन, माझ्या मनात लज्जा उत्पन्न झाली. मी स्वत ह अपंग असून, माझा नवरा वयोवृध्द आहे. अश्या परिस्थितीत, जर हा अर्ज मंजूर केला तर, अर्जदारापासून आम्हा दोघांच्या जिवीतास धोका आहे. साक्षीदार दत्तात्रय करपे व शामराव माने यांना इतर आरोपी त्रास देऊन, दबाव आणू लागले आहेत. तरी हा अर्ज फेटाळावा.

**४.** दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. युक्तीवादाचे वेळी मुळ फिर्यादीचे वतीने तिचा नवरा बाबासो कांबळे हा देखील हजर होता. सरकारी वकीलांचा युक्तीवाद संपल्यानंतर, त्याने देखील आपल्या बायकोची बाजू हिरीरीने आणि सविस्तर मांडली.

**५.** **कवठेमहंकाळ** तालुक्यातील म्हैसाळ (एम) येथील रहिवासी सौ. ललिला बाबासो कांबळे, हिने **ता.०६.०८.२०२२** रोजी **कवठेमहंकाळ** पोलीस ठाण्यात दिलेल्या वर्दी जबाबाचा थोडक्यात आशय असा आहे की, ती महार जातीची असून रामचंद्र पाटील हा त्यांचा शेजारी हिंदू मराठा जातीचा आहे. आधीची घटना ही ता.२३.०६.२०२२ ला सकाळी ९.३० वाजता घडली. त्यावेळी ग्रामपंचायतीच्या गटारीच्या दुरुस्तीचे काम चालू असताना, ती आणि तिचा नवरा तेथे गेले. तेव्हा रामचंद्र, शिवाजी, प्रविण आणि यशवंत या चौघांनी मिळून अचानक तिच्या नव-याला ढकलून दिले. आणि नंतर तिला देखील ढकलून दिले. मग ते म्हणाले की, ‘ महारांचे येथे काही नाही तुम्हाला येथून घालवतोच ' या संपुर्ण प्रसंगात जे चौघेजण आहेत, त्यात अर्जदार सुरज रामचंद्र पाटील याचे नाव देखील नाही. त्यामुळे दि. २३.०६.२०२२ रोजीच्या प्रसंगाशी त्याचा काहीही संबंध नाही.

**६** नंतरची घटना ही दि.२१.०७.२०२२ ला सकाळी ११.३० वाजणेचे सुमारास घडली. त्यावेळी फिर्यादी महिला तिच्या घरात स्वयंपाक करीत होती. त्यावेळी अर्जदार सुरज पाटील हा रामचंद्र पाटील व सरीता पाटील तसेच वन खात्यातील दोघांसह तिचे घराच्या शेजारी असणारी झाडे टेपने मोजत होता. हे समजल्यावर फिर्यादी ललिता हिने याबाबत विचारणा केली असता, अर्जदार सुरज पाटील याने तिच्या **हातास धरुन तिला ढकलून दिले** व तिला असे म्हणाला की, ‘ **तुझे येथे काही नाही, तु येथून निघायचे** '. या घटनेनंतर फिर्यादीचा नवरा तेथे पोहोचला. त्यानंतर, रामचंद्र पाटील याने असे शब्द उच्चारले की 'महारांच पण येथे काय नाय' थोडक्यात खुद्द हा अर्जदार ता. २१.०७.२०२२ रोजीच्या घटनेतदेखील जातीवाचक अवाक्षर देखील बोललेला नाही. हे वर्दीजबाबातूनच स्पष्ट होते.

**७** या अर्जाचे कामी मूळ फिर्यादीतर्फे नि.८ ला दाखल केलेल्या हरकतीच्या म्हणण्यातील, **चपलेने माराहाण करणे, बांगडया फुटेपर्यंत आणि कपडे फाटेपर्यंत फिर्यादी महिलेला फरफटत नेणे वगैरे मजकूर वर्दीजबाबात नाही. आणखी असे की, कोणत्याही आरोपीविरुध्द भा.द.वि. कलम ३५४ खाली गुन्हा दाखल झालेला नाही.**

ही देखील वस्तुस्थिती आहे.

**८ २०१९ ऑल एम.आर. (फौ.) २८२५ मध्ये प्रकाशीत झालेल्या किरण मधुकर इंगळे वि. महाराष्ट्र शासन** या निवाडयात परिच्छेद १३ मध्ये मा. औरंगाबाद खंडपिठाने असे धरले आहे की, ' Section 18 of the Act of 1989 does not bar judicial scrutiny of the accusation made in the complaint' याच निवाडयाच्या परिच्छेद क्रं. १५ मध्ये असे निर्देश देण्यात आले आहे की, The application for anticipatory bail can be entertained only on the ground of inability of the Act of 1989 and it would ascertainable **only on perusal of recitals of the FIR or complaint and not beyond that**. याच परिच्छेदात पुढे असे नमूद केले आहे की, Further scrutiny by summoning the case diary or other material to test the veracity of the allegations made in the FIR also not permissible.

**९** वरील निवाडयानुसार वर्दीजबाबाच्या व्यतिरिक्त अन्य मजकूर विचारात घेऊ नये. असे स्पष्ट निर्देश आहेत. त्यामुळे या जामीन अर्जाचे कामी निशाणी ८ मध्ये फिर्यादीच्या लेखी म्हणण्यात पश्चात बुध्दीने जो अतिरंजीत मजकूर आहे तो विचारात घेऊन हा अर्ज फेटाळता येणार नाही. आणखी असे की, याच कामी सह आरोपी सरीता रामचंद्र पाटील हिचा जामीन अर्ज क्रं. ७४२/२०२२ दि.२२.०८.२०२२ तात्कालीन मा. पाचवे अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांनी मंजूर केलेला आहे. त्यामुळे त्याच अटीवर हा अर्ज देखील मंजूर करण्यासारखी परिस्थीती आहे.

**१०** वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील आदेश केला आहे.

**आ दे श**

१. सदरचा अर्ज मंजूर केला आहे.

२. अर्जदार सुरज रामचंद्र पाटील यास जर त्याच्या विरुद्ध कवठेमहांकाळ पोलिस ठाण्यात नोंदविलेल्या गु.नों.क्र.३२० /२०२२ मध्ये भा.द.वि. कलम ३२३,५०४ सह कलम ३४ तसेच अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम कलम 3(1)(r) (S),3(2)(va), अन्वये गुन्हयाचेकामी अटक झाली तर, त्याचेकडून रक्कम रु.१५,०००/- चा लायक

जामीनदार आणि तितक्याच रक्कमेचे वैयक्तीक  बंधपत्र घेऊन त्याला  त्वरीत मुक्त करावे.

३.  अर्जदाराने तपासाचा अंतिम अहवाल येईपर्यंत, ज्या ज्या वेळी लेखी पूर्व सूचना देऊन संबंधीत तपासी अधिकारी त्यास चौकशीसाठी  बोलवून घेतील त्या त्यावेळी  सकाळी ११.०० ते दुपारी १.०० या वेळेत संबंधीत पोलिस ठाण्यात, तपास अधिकारी यांचे समोर हजर राहून तपासास सहकार्य करावे.

४.  अर्जदाराने सरकारपक्षाच्या साक्षीदारांवर कसल्याही प्रकारे दबाव आणू नये. तसेच पुराव्याचे कामी ढवळाढवळ करु नये.

Shriniwas Vyankatesh Potdar
Digitally signed by Shriniwas Vyankatesh Potdar
Date: 2022.11.08 15:18:08 +05'30'

सांगली. (श्री. व्यं. पोतदार )

ता.  ०५ /११ /२०२२ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, सांगली.

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file order/Judgment are same, word to word, as per the original order/Judgment.

Name of Stenographer : Sou. J. A. Pujari  (Steno Grade-I)
Court : Ad-hoc DJ-1 & Addl.Sessions Judge, Sangli.
Date : 05 /11  /2022
Signed by Presiding officer on :  05/11/2022
Uploaded on :  08/11 /2021